अंक पहिला   वेणू व हरिहरशास्त्री; चकोराचे स्वगत भाषण

अंक दुसरा   मनोहर व तरंगिणी :The first half of the पुराण Scheme of हरिहर and

सरस्वती

अंक तिसरा   चंद्रिका व हरिहर (प्रवेश तिसरा)

अंक चौथा   हरिहराचे आत्मगत भाषण (प्रवेश पहिला) प्रवेश दोनपैकी समाजाबद्दलचा भाग; शाळेतल्या मुलांच्या खोड्यांचे विहाराने केलेले वर्णन

(छाटीला टांचणी अडकविण्यासंबंधीचा भाग आहे त्याशिवाय)

अंक पांचवा   आनंदराव व हरिहरशास्त्री (साहित्यसिंह श्रीपाद कृष्ण कोल्हटकर – जीवनगाथा. गं. दे. खानोलकर पृ. १६६) या पत्रावरून श्री. कोल्हटकर हे इतरांच्या मतांना मान देत होते हे स्पष्ट दिसते.

पुढील पिढ्यांना, समकालीनांनी केलेल्या परीक्षणांचे महत्त्व अनेक दृष्टींनी वाटत असते. कधी कधी पूर्वग्रह आड येऊ शकतात हे खरे पण विशिष्ट नाटककार ही एक व्यक्ती, त्याचे नाट्यलेखन, नाट्यप्रयोग, त्यांचा लोकमानसावर होणारा प्ररिणाम हे सारे त्याने आपल्या डोळ्यांसमोर जाणकारीने पाहिलेले असते. असा परीक्षण लेखक जी माहिती देतो, नाटककाराच्या यशापयशाची जी कारणमीमांसा नोंदवीत असतो त्यातून नाटककाराच्या गुणदोषांची संगती लागत जाते. समकालीनांनी केलेल्या नाटकाच्या समीक्षणांना काही मर्यादा असू शकतात पण तरीही त्यांना ऐतिहासिक महत्त्व असते.

नाटकाच्या पहिल्या प्रयोगापूर्वी निवडक जाणकारांसमोर नाटकाचे वाचन होणे आवश्यक आहे हा विचार येथे येतो. अशा वाचनानंतर येणाऱ्या सूचनांचा, नाटककाराने विचार करावा. आवश्यक त्या सुधारणा कराव्यात हेही श्री. आगाशे यांनी सांगितले आहे. आजही अशी प्रथा चालू आहे. त्यावरून तिची उपयुक्तता, आवश्यकता स्पष्ट दिसते. श्री. कृ. कोल्हटकरसुद्धा आपल्या नाटकांचे वाचन, पहिल्या प्रयोगापूर्वी करीत असत आणि जाणकार व्यक्तींच्या

सूचना ऐकत असत. या संदर्भात कोल्हटकरांनी ‘ ात्मवृत्ता त लिहिलेला मजकूर, श्री. गं. दे. खानोलकर यांनी कोल्हटकरांच्या ‘ जीवनगाथे त दिला आहे. (पृ.१६०) ‘‘ ात दिवसात नाटक लिहून तयार झाले व माझ्या डोक्यावरचा एक मोठा बोजा उतरल्यासारखे होऊन, मला हलके वाटू लागले... मी मुजुमदारांस नाटक पूर्ण झाल्याचे कळविले. दुसऱ्या दिवशी... मुजुमदार जोगळेकर, राजहंस, बोडस वगैरे नट, सदाशिवराव भावे (हे त्यावेळी कंपनीत पाहुणे म्हणून होते) गडकरी, शंकरराव कुलकर्णी (‘सु मती कर्ते, हेही त्यावेळी कंपनीत हाते,) देवळे... इत्यादी सुमारे १५-२० मंडळी मजकडून नाटक वाचून घेण्याकरता माझ्या बिऱ्हाडी आली... वाचन सुमारे सव्वादोन तास चालले होते. नाटक चांगले वठले आहे, असेच सर्वांचे अभिप्राय पडले व मी त्याचे संगीत रूपांतर लवकरच करून द्यावे, अशी कंपनीने इच्छा दर्शविली. पुनर्विवाहासारख्या अप्रिय विषयावरले नाटक ‘ किर्लोस्कर मंडळी सारख्या साधारण सोवळ्या कंपनीने आवडीने बसवायला घ्यावे, ही गोष्ट मला फारच उत्तेजक वाटली. ’ श्री. कोल्हटकर यांची ही प्रतिक्रिया महत्त्वाची आहे. श्री. शंकरराव मुजुमदार यांचे नाटक धंद्याविषयीचे धोरण दूरदृष्टी येथे लक्षात येते.

श्री. आगाशे यांनी केलेल्या सूचनेवरून, नाटकलेखन हा प्रकार इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा कसा वेगळा आहे हेही येथे स्पष्ट होते. नाटकाचे आवाहन समूहाला असल्याने आपल्या प्रतिभेच्या भराऱ्यांचा प्रेक्षकांच्या मनावर इष्ट-अनिष्ट कोणता परिणाम होईल याचा अंदाज नाटककाराने प्रथम घेतला पाहिजे. निर्दोष वाङ्मयकृती आणि नाट्यप्रयोग - एक व्यवसाय या दोन्ही दृष्टीने हा विचार आजही महत्त्वाचा आहे.

मतिविकार नाटकाच्या मूळ विषयाला, त्याच्या हेतुप्रधानत्वाला या परीक्षणात महत्त्व दिलेले नाही. हे नमूद करावेसे वाटते. मतिविकार हे एक सामाजिक समस्या मांडणारे नाटक आहे. निदान नाटककाराचा मूळ हेतू तो आहे. कोल्हटकरांचा काळ हा सामाजिक चळवळींचा काळ होता. त्या चळवळींचा, सुधारणाविषयक अनुकूल - प्रतिकूल मतांचा अनुबंध कोल्हटकरांच्या नाटकात कसा दिसून येतो या विचारावर श्री. आगाशे यांनी मुळीच लक्ष केंद्रित केलेले नाही. ‘ तिविकार मध्ये इतर नाटकांच्या तुलनेने उद्दिष्ट हेतूस प्राधान्य मिळालेले आहे एवढाच अभिप्राय व्यक्त केला आहे. हे या परीक्षणलेखाचे वैशिष्ट्य मानावे लागते. ज्या काळात नाटकातील सामाजिक प्रश्नांच्या हाताळणीकडे, सामाजिक आशयाकडे लक्ष देऊन नाटकाची पारख केली जात होती त्या काळात नाटकाच्या विषयाकडे, त्यातील वैचारिकतेकडे फार लक्ष न देता कलाकृतीच्या अंगाने या नाटकाकडे

पाहण्याचा प्रयत्न करणे हे श्रेय विशेष मानावे लागेल. नाटकाची भाषा, संवाद, व्यक्तिरेखाटन या संदर्भात भरपूर उदाहरणे देऊन विवेचन केलेले आहे. श्लील-अश्लीलतेचा प्रश्न हा त्याकाळच्या समीक्षाविचारातील महत्त्वाचा प्रश्न होता. त्याचा संदर्भ कलेच्या प्रयोजनाशी निगडित होता. मनोरंजनाबरोबरच लोकशिक्षण हा कलेचा हेतू मानला जात असल्याने भाषेची सोज्वळता अपेक्षिली जात होती. नाटकाला असलेल्या दृक् परिमाणामुळे तर श्लील-अश्लीलासंबंधी प्रेक्षक, परीक्षणलेखक जागरूक असत. कोल्हटकरांच्या कोट्या काही वेळा अश्लील असतात असा जो शेरा श्री. आगाशे यांनी मारला आहे त्यावरून या प्रश्नाचे त्याकाळी असलेले महत्त्व लक्षात येते.

श्री. आगाशे यांनी या परीक्षणलेखावर घालून घेतलेली मर्यादाही ध्यानात घेणे जरूर आहे. ‘म हाराष्ट्र-कवी कोल्हटकर एवढाच विचार करावयाचे लेखकाने ठरविलेले आहे. ‘ कवी हा शब्द संस्कृतातील व्यापक अर्थाने येथे योजलेला दिसतो. दुसरे म्हणजे कोल्हटकरी नाटकांचा, संगीत हा एक विशेष होता. स्वत: कोल्हटकर संगीत शास्त्रातले जाणकार होते. पद्यरचना, पदांच्या चाली, पदांमधील कल्पना प्राचुर्य, या त्यांच्या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या काव्यगुणांचा विचार डोळ्यापुढे असावा असे ‘ महाराष्ट्र-कवी या शब्द योजनेवरून वाटते पण त्याबाबत या परीक्षणात काही लिहिलेले नाही. तसेच समीक्षक कोल्हटकरांचा नाटककार कोल्हटकरांवर काही प्रभाव दिसतो का यादृष्टीनेही विचार मांडलेले नाहीत. श्री. कोल्हटकर यांच्या समीक्षालेखनातून मराठी समीक्षाशास्त्र सिद्ध झालेले आहे. समीक्षेचे काही सिद्धांत मांडून मराठी समीक्षाविचाराला त्यांनी नवी दिशा दिलेली आहे. या परीक्षणलेखाच्या काळापर्यंत कोल्हटकरांच्या समीक्षा विचारातील कर्तृत्त्वाचे नेमके मूल्यमापन झालेले नव्हते हे खरे, पण नाटककार होण्यापूर्वी ते समीक्षक म्हणून नावारूपाला आलेले होते, नाटकासंबंधीचा त्यांच्या दृष्टिकोन त्यांच्या नाट्यपरीक्षणांतून दिसत होता म्हणूनच त्यांच्या नाट्यविचारांचा कोणता परिणाम त्यांच्या नाट्य लेखनावर दिसतो यादृष्टीने विवेचन केले गेले असते तर लेख अधिक भरीव झाला असता. तसेच कोल्हटकरांचा विनोद हे त्यांचे एक बलस्थान होते. ‘ तिविकार मध्ये विनोदाला किती स्थान आहे याचा अधिक सखोल विचार यायला हवा होता. कोल्हटकरांच्या काही अश्लील कोट्यांचा निर्देश करण्यापुरता विनोदाचा विचार आला आहे. पण करुण आणि हास्य या दोन रसांची गुंफण कोल्हटकरांना साधते कां ती न साधल्यामुळे नाट्याची कोणती हानी झाली आहे यादृष्टीने काही चर्चा लेखात यायला हवी होती. देवल व कोल्हटकर यांच्या कवित्त्वशक्तीची सुरेख आणि अचूक तुलना श्री. आगाशे यांनी केली आहे. कोल्हटकरांच्या

प्रतिभाशक्तीच्या भरारी मारण्याच्या गुणधर्मामुळेच नाट्यरचनेवर त्यांना घट्ट पकड ठेवता आली नाही, कलात्मक निवडीचे तत्व त्यांच्या ध्यानात येऊ शकले नाही, ते चमत्कृतीत गुरफटले आणि नाट्यात्मक प्रभाव उणावला हे विश्लेषण महत्त्वाचे आहे. कोल्हटकरांच्या वाचक-प्रेक्षक वर्गाबद्दल श्री. आगाशे यांनी मांडलेले विचार त्यांच्या सूक्ष्म विचारशक्तीचे, अभ्यासपूर्ण विवेचनाचे द्योतक आहे.

गो. ग. भागवत यांनी ' नाटकातील नायक व पापभीरुत्व या लेखात (रंगभूमी, व. ३, अं. ६-७, जाने/फेब्रु. १९१०) ' मतिविकार मधील मनोहर या व्यक्तिरेखेविषयी लिहिले आहे. संस्कृतमधील नाट्यसंकल्पनेनुसार नायक हा धीरोदात्त, धीरगंभीर असावा लागतो त्यादृष्टीने ' मतिविकार मधील मनोहर हा नायक ठरतो. श्री. भागवत यांनी आपल्या लेखात वेगवेगळ्या नाटकातील नायकांच्या वर्तनाची चिकित्सा केली आहे. त्यांच्या मते मनोहर हा अत्यंत पापभीरु आहे. त्याला फक्त खोटे पत्र पोचविण्याचे काम दिले होते तरी ते पत्र पोचविण्यापूर्वीच त्याची जिव्हा कोरडी पडली होती. धर्मराजासुद्धा ' नरो वा कुंजरो वा असे खोटे बोलला पण मनोहरपंताने तितकेही पाप केले नाही. यामुळे धर्मराजापेक्षा मनोहरपंताची योग्यता मोठी ठरते.

सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया
यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशु: ।

याप्रमाणे सरस्वतीसारखी तरुण व रूपवती स्त्री एकांतात वश होत असता मनोहरपंतांचे मन विरघळले नाही यामुळे त्याची योग्यता 'मुक्ता मध्येच केली पाहिजे. श्री. भागवत यांच्या मते मनोहराची भूमिका प्रत्येक पापभीरू प्रेक्षकास आनंद देते. नायकाची भूमिका इतकी प्रेमळ व पापभीरू क्वचितच पाहण्यास सापडेल.

मनोहरला धर्मराजापेक्षा श्रेष्ठ ठरविणे, त्याची गणना 'मुक्ता मध्ये करणे, यातील अतिशयोक्ती स्पष्ट आहे. यावरून तत्कालीन टीकाकारांच्या नायकत्वाबद्दलच्या कल्पना, चारित्र्य, सदाचरण यावर असलेला कटाक्ष हे ध्यानात घेण्याजोगे आहे. वास्तविक ' मतिविकार मध्ये नायक कोणाला मानायचे हा प्रश्नच आहे. संस्कृतमधील संकेतानुसार मनोहराला नायक मानले तर त्याच्याकडून नाट्याला गती देण्याजोगे काहीच घडत नाही. तो

सदाचारी पण क्रियाशून्य आहे. पापभीरूत्व हा गुण महत्त्वाचा मानून त्याला नायक ठरवून श्री. भागवत यांनी व्यक्त केलेले विचार हे वाङ्मयीन सदभिरुचीचे द्योतक आहेत.

रंगभूमी वर्ष ४, अंक ४, एप्रिल १९११ मध्ये ' पत्रव्यवहार-चुकांची झोळी या सदरात ' जय-विजय या नावाने ' मतिविकार नाटकाच्या प्रयोगातील काही दोष दाखविले आहेत. लोकरंजन करून, सामाजिक विचारांच्या बाबतीत लोकमत बनविण्याचा किर्लोस्कर नाटक मंडळीचा प्रयत्न स्तुत्य आहे. कोल्हटकरांची नाटके करण्यात कंपनीने दाखविलेली चिकाटी प्रशंसनीय आहे असे मत व्यक्त केले आहे.

या मतावरून लक्षात घेण्याजोगे आहे की, कोल्हटकरांच्या नाटकांवर कितीही टीकेची झोड उठत असली तरी समाजावर त्यांच्या नाटकांचा काही परिणाम निश्चित होत होता. किर्लोस्कर नाटक मंडळी ही मुळातच सर्वबाबतीत दूरदर्शी धोरण स्वीकारलेली संस्था होती. सामाजिक सुधारणेकडे तिचा कल होत होता, नाट्यविषयक सुधारणा हे तिचे ध्येय होते आणि कोल्हटकरांच्या नाटकातील कथानकांची स्वतंत्रता ही फार मोठी जमेची बाजू म्हणून मानली जात होती.

' मतिविकार च्या संबंधीची विविध मते -

श्री. पु. रा. लेले यांनी ' तात्यांची राजस नायिका ९ या आपल्या लेखात म्हटले आहे की ' मतिविकार नाटकाचा अभ्यास, नाटककार होऊ इच्छिणाऱ्याला अवश्य आहे. नाटक कसे लिहू नये हे ' मतिविकार च्या अभ्यासाने समजते. ' मतिविकार नाटकाचे नायक-नायिका कोण हा कूट प्रश्न म्हणून घालण्याच्या लायकीचा प्रश्न आहे. श्री. चिं. ग. कोल्हटकर यांनी ' बहुरूपी मध्ये जे लिहिले आहे की, मतिविकाराचे परिणामकारी चित्र ' प्रेमसंन्यास मध्ये पाहावयास सापडले. - हे मत रास्त आहे असे श्री. लेले म्हणतात. श्री. लेले यांच्या मते ' मतिविकार अत्यंत विस्कळित आहे. तीन कथानके एका नाटकात कोंबावी, तसा प्रकार ह्या नाटकात झाला आहे, पण ह्या नाटकातच तात्यांची अगदी वास्तव आणि ठसठशीत अशी नायिका आहे.

श्री. गोविंदराव टेंबे यांनी ' मतिविकार कितीतरी वर्षांनी पुन: रंगभूमीवर आणले. श्री. टेंबे यांनी ' जीवनविहार मध्ये (पृ.२१४) ' मतिविकार संबंधी जे लिहिले आहे तो संदर्भ श्री.

लेले यांनी दिला आहे. -श्री. टेंबे लिहितात, ''मला हे नाटक कोल्हटकरांच्या अचाट व अभिजात बुद्धिवैभवाचे निदर्शक वाटे, म्हणून ही त्यांची सुंदर नाट्यकृती पुन: रंगभूमीवर आणणे आपले कर्तव्य आहे अशी भावना माझी होती.'

मतिविकार संबंधी किती परस्परविरोधी मते व्यक्त झालेली आहेत हेच श्री. लेले व श्री. टेंबे यांच्या लेखनावरून दिसून येते. श्री. लेले यांनी आपल्या लेखात अशीही माहिती दिली आहे की, गडकरी मोठ्या अभिमानाने 'मतिविकार नाटकाचे पाठांतर करीत असत ते नाटक पडले त्यावेळी गडकऱ्यांनी ''तात्या शंभर वर्ष आधी जन्माला आले.' असे उद्‌गार काढले.

श्री. गडकरी हे श्री. कृ. कोल्हटकरांना आपले गुरु मानीत होते तेव्हा त्यांची ही प्रतिक्रिया आपण समजू शकतो.

श्री. वि. स. खांडेकर१० लिहितात, '' मतिविकार पर्यंत कोल्हटकरांनी जी काही सुधारकी मते पुढे मांडली ती गनिमी काव्याने अद्‌भुतरम्य कथानके घेऊन व राजे-राण्यांचा आश्रय करून त्यांनी पूर्वी वाचकांवर हल्ला केला होता; पण 'मतिविकार मध्ये राजा. राणीने उच्चाटन होऊन लोकसत्ताक राज्य आले व ते सुधारकी तत्त्वांची गर्जना करू लागले... 'मतिविकार मधील नीच व थिल्लर पात्रे जुन्या मताची आणि उदात्त व उदार पात्रे नव्या मताची, असे दुर्दैवाने ढोबळ वर्गीकरण झाले.'

श्री. वि. स. खांडेकर११ यांनी असेही मत व्यक्त केले आहे की, ''मतिविकार ह्या त्यांच्या खऱ्याखुऱ्या पहिल्याच सामाजिक नाटकात पुनर्विवाहाच्या मंडनाचा विषय त्यांनी ज्या पद्धतीने मांडला आहे, ती पाहाता विनोदी प्रतिभेलाच सुचेल, अशा पद्धतीने तो मांडायची शक्ती त्यांच्या ठिकाणी किती मोठ्या प्रमाणात होती, ह्याची चुणुक स्पष्ट दिसते.'

स्वत: श्री. कृ. कोल्हटकर यांना स्वत:च्या या नाटकाबाबत काय वाटत होते तेही पाहण्यासारखे आहे. श्री. कृ. कोल्हटकर यांनी १७ नोव्हेंबर १९२३ रोजी श्री. केशव वामन साठे यांना जे पत्र पाठविले ते 'सत्यकथा मासिकाच्या फेब्रुवारी १९६६ (पृष्ठ २७ ते ३०) च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. ही माहिती श्री. गं. दे. खानोलकर यांनी दिलेली आहे.१२

या पत्रात श्री. कृ. कोल्हटकर लिहितात, ‘‘नाटकांतले सर्व भाग परस्परावलंबी व सुसंघटित असले पाहिजेत, ह्याची जाणीव मला स्वत:ला ‘ मतिविकार लिहिले, तेव्हापासून विशेष तीव्रतेने होऊ लागली. ’१३

श्री. कृ. कोल्हटकर यांच्या पत्रातील या अवतरणावरून स्पष्ट दिसते की या नाटकातील उणीवा त्यांना स्वत:लाही मान्य होत्या.

रंगभूमी नियतकालिकात ‘ मतिविकार वर श्री. आगाशे यांनी जसा विस्तृत परीक्षणलेख लिहिला तसाच त्याहूनही सविस्तर विवेचन करणारा लेख श्री. न. चिं. केळकर१४ यांनी लिहिलेला आहे. या लेखात, ‘ मतिविकार चा, विषयप्रतिपादन आणि एक वाङ्‌मयाकृती अशा दोन्ही दृष्टीने समतोल परामर्ष घेतलेला आहे. म्हणून श्री. न. चिं. केळकर यांच्या विवेचनातील आशय याठिकाणी देणे योग्य वाटते.

मतिविकार वर वेड्यावाकड्या टीकाच खूप झाल्या होत्या. श्री. केळकर यांना मनाजोगी अशी टीका वाचावयास मिळाली नव्हती. त्यांना समर्पक, भरपूर, सर्वांगपरामर्षी व नि:पक्षपाती टीका अभिप्रेत होती.

श्री. केळकर यांनी श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांच्या हेतूप्रधानतेविषयी लिहिले आहे. श्री. कोल्हटकर यांचे हेतू किती सफल होतात हे पाहण्यासाठी त्यांनी प्रथम त्यांच्या नाटकांच्या शीर्षकांचा परामर्ष घेतला आहे. व त्या संदर्भात, श्री. कोल्हटकर यांना विरोधाभास अलंकार आवडतो असा अभिप्राय दिला आहे. ‘ मतिविकार मध्ये मुख्य विषय बराच डोळ्यापुढे राहतो असेही श्री. केळकर यांनी म्हटले आहे. ‘ मतिविकार चा विषय विधवाविवाह. आणि याच्या इतका वादग्रस्त मुद्दा समाजसुधारणांच्या यादीत दुसरा कोणताच नाही. श्री. कोल्हटकर यांनी आपल्या नाटकात विधवाविवाहासंबंधाने साधक अशा बहुतेक कारणांचा समावेश केला आहे परंतु बाधक कारणांचे खंडन यादृष्टीने ती वकिली तितकीशी साधली नाही. टर उडवून, थट्टा करून हेतू साध्य होत नाही. समाजाला वश करण्याची ती साधने नव्हेत. मन वळविणे महत्त्वाचे आहे असे मत परीक्षण लेखकाने व्यक्त केले आहे. प्रगल्भ, परिपक्व बुध्दी कशी असते ते शिकण्याच्या दृष्टीने श्री. न. चिं. केळकर यांचे हे विवेचन खूपच मोलाचे आहे.

नाटक या दृष्टीने, ' मतिविकार चे परीक्षण करताना श्री. केळकर यांनी प्रथम नाटकाच्या संविधानकाबद्दल मत दिले आहे. श्री. कोल्हटकर यांच्या इतर नाटकांतील संविधानकांच्या तुलनेने ' मतिविकार चे कथानक बरेच सोपे आहे. नाटकाच्या अखेरची जुळवाजुळव बरी साधली आहे. परंतु नाटकाच्या शेवटी जी एक प्रकारची शुद्ध भावना मनावर राहावयास पाहिजे ती राहात नाही. श्री. कोल्हटकर यांचा विनोद आणि कोट्या याबाबत श्री. केळकर यांनी अनुकूल मत दिले आहे. याबाबतीत श्री. कोल्हटकर यांच्यावर जो अश्लीलतेचा आरोप केला जात असे त्याचे विस्तृत, मुद्देसूद खंडन श्री. केळकर यांनी केले आहे.

मतिविकार मध्ये नायक-नायिका कोणाला म्हणावे याचा निर्णय करणे कठीण आहे असे मत श्री. न. चिं. केळकर यांनीही दिलेले आहे. या नाटकाला A Drama without a hero असे म्हणावेसे वाटते असे ते म्हणतात. नाटकातील पात्रांच्या स्वभावाची व वर्तनाची चिकित्साही त्यांनी केली आहे. वेणूबाई या पात्राचा प्रत्येक प्रवेश व भाषण किळसवाणे आहे हे पात्र नाटककर्त्याने अजिबात गाळावयास पाहिजे होते. चकोर या पात्रावरही श्री. केळकर नाराज आहेत. मनोहर, चंद्रिका, सरस्वती, विहार व आनंदराव ही पात्रे निव्वळ नाटक या दृष्टीने, हेतुसिद्धिच्या दृष्टीने नव्हे, बरी आहेत असा श्री. केळकर यांचा अभिप्राय आहे.

या नाटकाच्या भाषेवर बरेच आक्षेप घेतलेले आहेत. यातील पात्रे जवळजवळ सारखीच भाषा बोलतात. ती भाषा फारच प्रौढ व सुसंस्कृत आहे. पात्रांच्या तोंडची भाषा, लिहिण्याच्या, किंबहुना निबंधाच्या भाषेसारखी आहे. स्त्रियांच्या तोंडची भाषाही बोजड आहे. हे आक्षेप सोदाहरण स्पष्ट केले आहेत.

श्री. कोल्हटकर यांच्या नाटकांतील पद्यांबाबतची चर्चाही श्री. केळकर यांनी केली आहे. त्यांच्या पद्यातील कल्पना फार उत्कृष्ट असतात पण त्या व्यक्त करणारे शब्द कित्येक वेळा फारच अवजड, बोजड, संस्कृत कोशाच्या कानाकोपऱ्यात सापडणारे असतात. कित्येक ठिकाणी अपप्रयोग व इंगजी धर्तीवरचे प्रयोग असतात असे सोदाहरण दाखवून ' मतिविकार मधील पद्ये सर्वात सोपी झाली आहेत असे मत दिले आहे.

एक उत्तम परीक्षण लेख म्हणून श्री. न. चिं. केळकर यांच्या या लेखाचा अभ्यास महत्त्वाचा वाटतो. समकालीन नामवंत लेखकावर, तितक्याच, किंबहुना अधिक नामवंत लेखकाने समतोल, सर्वांगीण पद्धतीने लिहिणे तसे सोपे नसते. श्री. कोल्हटकर यांच्या लेखनातील

दोषांवर त्यांनी नेमके बोट ठेवले आहे व आक्षेपकांच्या अवाजवी टीकेचा समाचारही घेतला आहे. नाटक हे समाजसुधारणेचे साधन मानणाऱ्या लेखकांवर, त्यांचा हेतू साध्य होण्याच्या दृष्टीने कोणती जबाबदारी असते ते त्यांनी सांगितले, त्याचप्रमाणे नाटकातील हेतू गौण मानून एक वाङ्मयकृती म्हणून कसे परीक्षण केले पाहिजे तेही दाखविले. या दोन्ही दृष्टीने श्री. केळकर यांचा लेख विचारप्रवर्तक आहे.

महाराष्ट्रीय नाटककार : भाग २ - श्री. शं. बा. मुजुमदार

रंगभूमी नियतकालिकात श्री. शं. बा. मुजुमदार यांनी महाराष्ट्रीय नाटककारांची जी चरित्रे लिहिली त्यात श्री. कृ. कोल्हटकर यांचे चरित्रही लिहिले आहे. (रंगभूमी, नवी आवृत्ती मे १९२७, अंक २ रा, पृष्ठ १३ ते २८) या चरित्रात श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांविषयी, नाट्यगुणांविषयी श्री. शं. बा. मुजुमदार यांची मते व्यक्त झालेली आहेत,

१८९६ मध्ये श्री. कृ. कोल्हटकरांचे ‘ वीरतनय किर्लोस्कर नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले तेव्हापासून ते किर्लोस्कर नाटक मंडळीचे नाटककार बनले हा उल्लेख या प्रकरणात येऊन गेलाच आहे. ‘ वीरतनय नंतर एकामागून एक त्यांची नाटके किर्लोस्कर नाटक मंडळीने स्वीकारली याला कारण त्यांचे नाट्यगुण. श्री. मुजुमदार म्हणतात, काव्य, कल्पना व संविधानक यांची चमत्कृती, उठावदार प्रसंग व ठरिलिश   ही त्यांची वैशिष्ट्ये होती. पूर्वीच्या संस्कृत नाटकात एकाच साच्याची संविधानक रचना असे. श्री. कृ. कोल्हटकर यांनी त्यात विविधता आणली. नाटकाला उपकथानकाची जोड देऊन विनोद उत्पन्न केला. त्यांच्या कोणत्याही नाटकात अनावश्यक विनोदी पात्र नाही. श्री. मुजमदार लिहितात, गुप्तमंजुष, प्रेमशोधन, मतिविकार या नाटकात संविधानक रचनेचे चातुर्यच विशेष दिसून येते.

मतिविकार च्या संविधानकाबाबतचे, हे श्री. मुजुमदार यांचे मत आश्चर्यकारक वाटते. कदाचित तो त्या काळाचा प्रभाव असेल, कदाचित प्रयोगदृष्ट्या ‘ मतिविकार चे संविधानक रंगतदार वाटले असेल.

श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांतील समाजसुधारणाविषयक मूळ उद्दिष्ट मात्र कल्पनेच्या भराऱ्यांमध्ये बाजूलाच राहते असे श्री. आगाशे यांच्यासारखेच मत श्री. मुजुमदार यांनी दिले आहे. श्री. आगाशे यांनी केलेली देवल व कोल्हटकर यांची तुलना मार्मिक व समतोल आहे असे ते म्हणतात.

या कोल्हटकर चरित्राच्या प्रस्तावनेत, (रंगभूमी, जुलै-ऑगस्ट १९२७ अंक ४/५ पृष्ठ १ ते ८) त्यांनी मराठी रंगभूमीला कोणते नवीन स्वरूप दिले त्याचा आढावा घेतलेला आहे तो असा -

१) श्री. कृ. कोल्हटकर यांनी, पूर्वपरंपरा असलेली नटीसूत्रधार संवादपद्धती पूर्णपणे गाळली. स्वतंत्र पात्राकडून किंवा नाटकात त्याच पात्राकडून ईशस्तवन करण्याचा परिपाठ घातला.

२) त्यांनी आपल्या नाटकातील नायक-नायिकेला मदनबाधा व विरहव्यथा यांपासून दूर ठेवले. दुष्यंत, पुरुरवा, चारुदत्त हे नायक विषयलंपट होते.

हा पूर्वसंस्कार कोल्हटकर यांच्या मनावरून पूर्णपणे पुसला गेला असे मात्र नाही हेही स्पष्ट केले आहे. Love at first sight हा प्रकार सरोजिनी-विक्रांत, (मूकनायक) शालिनी-शूरसेन (वीरतनय) यात आहेच.

३) श्री. कृ. कोल्हटकर यांनी सामाजिक विचारांची नाटके लिहिली.

याशिवाय नाटकातील पदे, त्यांच्या चाली, भाषा इ. बाबतीतही वेगळेपण सांगता येण्यासारखे होते परंतु एवढ्याच बाबींचा ठळक उल्लेख आहे.

श्री. कृ. कोल्हटकर यांच्या आधीच्या पिढीत कानिटकर व भागवत हे सामाजिक नाटके व प्रहसने लिहिणारे लेखक होते. त्यांच्यापेक्षा श्री. कृ. कोल्हटकरांचे वेगळेपण काही होते का कोणते याचा विचार येथे आलेला नाही. इतर मुद्दे सर्वांच्या विवेचनात साधारणपणे समान आहेत.

श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकाचा आणि त्यावरील चर्चेचा परामर्ष येथे थोडा अधिक घेतला कारण नाटककार म्हणून त्यांची स्मृती आज फारशी राहिलेली नाही. त्यांच्या नाट्यप्रयोगांबाबत तर उपलब्ध माहितीवरच अवलंबून राहावे लागते. हा, त्याकाळी एवढा वादग्रस्त ठरलेला नाटककार काळाच्या पार्श्वभूमीवरच समजावून घ्यावा लागते हे मतमतांतरांवरून स्पष्ट होते. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांच्या चर्चेवरून कलानिर्मिती प्रमाणेच समीक्षेलाही मर्यादा असतात हे ध्यानात येते.

अन्य काही मराठी नाटकांच्या परीक्षणांचा संक्षिप्त आढावा

१) राष्टे्ध्दार - (वर्ष १, अंक ५-६, डिसेंबर १९०७ व जानेवारी १९०८ ‘स्फुट विवेचन - पृ. २५ ते ३२)

स्फुट विवेचन या सदरातील हे परीक्षण संपादक श्री. शं. बा. मुजुमदार यांनी केलेले आहे.

हे मुंबईच्या ग्रंथप्रकाशक समितीकडून प्रसिद्ध झालेले संगीत नाटक आहे. याचे प्रयोग स्वजनहितैषी मंडळी करीत असे. परंतु सरकारने बंदी आणल्यामुळे त्याचे प्रयोग व ती करणारी मंडळीही बंद झाली.

राष्टे्द्धार हे नाटक संपादकांनी पाहिलेले नाही म्हणून ते प्रयोगाच्या दृष्टीने वाचून मनावर काय संस्कार होतात ते मुख्यत: पाहिले पाहिजे असे ते म्हणतात.

याचा अर्थ लिखित स्वरूपातील नाटक स्वत:च्या मानसिक रंगभूमीवर साकार करता येते हे श्री. मुजुमदार यांना मान्य आहे.

श्री. मुजुमदार यांच्यामते विशिष्ट हेतूने नाट्यरचना केली जात आहे हे चांगले आहे पण तो हेतू किंवा उद्देश नाटकरूपाने व्यक्त करताना लेखणीला स्वैर सोडणे योग्य नाही. यामुळे हेतूही तडीला जात नाही व प्रेक्षकांचे रंजन होत नाही. ‘ राष्ट्रोद्धार च्या बाबतीत असाच प्रकार झालेला आहे.

हे नाटक शिवाजीच्या कारकीर्दीवरील व विशेषत: त्याच्या पराक्रमाचे वर्णन करणारे आहे. परंतु शिवाजी औरंगजेबाच्या तावडीतून सुटून आला एवढा मुख्य प्रसंग वगळता बाकीचे प्रसंग ठराविक साच्यातले सामान्य प्रसंग आहेत. या नाटकावर बंदी घालण्यासारखे काहीही नाही. याच कथाभागावर '' शिवाजी नाटक ' या नावांनी दोन नाटके प्रसिद्ध झालेली आहेत. एक कै. नारायण बापूजी कानिटकर यांचे व दुसरे आण्णा मार्तंड जोशी यांचे.

राष्ट्रोद्धार ची रचना बरोबर झालेली नाही. संविधानकाची जुळणी, भाषा, कविता (नाटकातील पदे असे म्हणावयाचे आहे.) यापैकी काहीही बरोबर नाही. असे नाटक बंद केले काय व न केले काय दोन्ही सारखेच. सबंध नाटकात वाचण्यासारखा किंवा पाहण्यासारखा एकही प्रवेश किंवा एकही प्रसंग नाही असे परखड मत श्री. मुजुमदार यांनी व्यक्त केले आहे. हे नाटक संगीतात का केले हे कळत नाही असे ते म्हणतात पण ऐतिहासिक नाटकात - विशेषत: शिवाजीच्या जीवनावरील नाटकात संगीत हा प्रकारच कृत्रिम व रसहानी करणारा आहे असे मत मात्र मांडलेले नाही हे ध्यानात घेण्याजोगे आहे.

या नाटकात प्रवेशांची संगती लावता आलेली नाही. एका अंकात एक प्रवेश रायगडास तर दुसरा दिल्लीस. असा दोष दाखविला आहे.

सद्य:स्थितीचे चित्र पर्यायाने दाखवावे असा जर ग्रंथकाराचा अंत:स्थ हेतू असेल तर तो अजिबात फसला आहे असे नमूद करून श्री. मुजुमदार म्हणतात की, देशाभिमान जागृत करणारी नाटके पुढे आली पाहिजेत ही गोष्ट खरी आहे, परंतु त्याबरोबर सद्गुण व उदात्तपणा हे जे शील (उहरीरलींशी) बनविणारे गुण हेही त्यात स्पष्ट दिसले पाहिजेत. या नाटकातील शिवाजीच्या तोंडी असलेल्या भाषेवरून हे गुण त्याच्यात नसल्याचे दिसून येते.

एकूण '' करायला गेले एक आणि झाले भलतेच ' असे '' फाजील स्पष्ट मत श्री. मुजुमदार यांनी व्यक्त केले आहे.

ऐतिहासिक नाटकाची भाषा या महत्त्वाच्या मुद्याचा परामर्ष या परीक्षणात घेतलेला आहे. हा विषय पुढेही बहुचर्चित ठरलेला दिसतो. नाटककाराचा नाट्यलेखनाभागील मूळ हेतू उदात्त असला तरी तो नाटकाद्वारे प्रभावीपणाने व्यक्त झाला तरच नाटक यशस्वी होते हा या परीक्षणलेखातील गर्भित विचार महत्त्वाचा आहे.

‘प्रभावती — कै. विनायक जनार्दन करंदीकर

नाट्यकलेची प्रभा या शीर्षकाखाली ‘प्रभावती नाटकाचे परीक्षण, श्री. रामचंद्र गोविंद दंडवते यांनी केलेले आहे. (वर्ष ३, अंक १, ऑगस्ट १९०९, पृष्ठ १ ते ८)

हे परीक्षण, प्रयोग पाहून केलेले परीक्षण आहे. त्यावेळी पुस्तक छापलेले नव्हते. ही प्रयोगसमीक्षा असली तरी प्रयोगाच्या अंगाने यात फारसे लिहिलेले नाही. नाटकाचा लेखक हयात नसल्यामुळे लेखकाच्या पश्चात् दोषांचे चर्वितचर्वण करणे बरे नाही असेही परीक्षण लेखकाने म्हटले आहे. यात समीक्षकाजवळ आवश्यक असलेला सुसंस्कृतपणा दिसतो. पण त्याच्या मते, जे एक सामान्य ऐतिहासिक नाटक आहे. त्यावर लिहावयास तो का प्रवृत्त झाला याचा उलगडा होत नाही. या नाटकाच्या निमित्ताने एखाद्या वाङ्मयीन प्रश्नाची चर्चा करावयाची होती, एखाद्या विशिष्ट घटकासंबंधी विचार मांडावयाचा होता असेही दिसत नाही. श्री. दंडवते यांच्या परीक्षणानंतर संपादकांनी या नाटकावर टिपण लिहिले आहे ते अधिक महत्त्वाचे आहे.

श्री. दंडवते यांनी नाटकाचे कथानक दिले आहे. प्रभावती ही पृथ्वीराज चव्हाण याची मुलगी. तिची कथा नाटकात आहे. हे नाटक शोकपर्यवसायी करावयास हवे होते. आनंदपर्यवसायी केले हे चूक, असे श्री. दंडवते म्हणतात. नाटकात, कथानकाशी संबंधित नसलेली पात्रे घातली आहेत. भाषा काही ठिकाणी अश्लील आहे. असे आक्षेप त्यांनी घेतलेले आहेत. हे नाटक नाट्यकलाप्रवर्तक मंडळीने रंगभूमीवर आणले. प्रयोगाची टापटीप, पोशाख, देखावे इ. बाबतीत नाटक बरे आहे, असा श्री. दंडवते यांचा अभिप्राय आहे. याहून अधिक तपशीलात्मक किंवा सखोल चर्चा त्यांनी केलेली नाही.

या नाटकासंबंधी संपादक श्री. मुजुमदार म्हणतात, नाट्यकलेसारखी संपन्न व अनुभवी कंपनी प्रयोग करीत असल्याने हे नाटक काहीसे दृष्टिरम्य व अधूनमधून श्रवणरम्य झालेले आहे. नाहीतर सर्व नाटकरचनेत सुसंगतता कोठेच नाही. मनोवेधक भाषणे, रसपरिपोष नाही. प्रवेश संपून गेला तरी हे कोण, इथे का व कसे आले हे समजत नाही. विनोदासाठी म्हणून घातलेले प्रसंग अत्यंच पांचट आहेत.कथासूत्र ध्यानात घेण्याला किंवा सरस रीतीने क्रमाने ते मनामध्ये भरत जाण्याला योग्य अवकाश ठेवण्याचे अगत्य लेखकाला वाटलेले

नाही. कित्येक ठिकाणच्या योजनाही प्रसंगाशी व कथानकाशी न जुळणाऱ्या आहेत. बादशाही दरबार म्हणजे तेथे आपला पऱ्यांचा नाच पाहिजेच. मग तो बादशहा या नाटकातल्याप्रमाणे परमुलुखातल्या रणमैदानावरील लष्करी छावणीत का असेना

त्यावेळच्या नाट्यप्रयोगांमध्ये आढळणाऱ्या अवास्तवतेवर, चुकीच्या प्रथांवर संपादकांनी केलेली ही टीका योग्यच आहे. ते म्हणतात नवी नाटके पुढे येताना ती जशी नानाप्रकारच्या दर्शनीय सोंगाढोंगानी सजवून बाहेर काढण्याविषयी ऐपतदार नाटक मंडळीची मुख्यत: हाव असते तशीच ती वाङ्मयाच्या दृष्टीनेही शुद्ध, सरस व विचारपूर्वक ठेवण्याविषयी नाट्यकवींनी जरुर मनावर घेतले पाहिजे.

नाटकमंडळी आणि लेखक या दोघांनाही हा इशारा द्यावासा वाटलेला आहे याचा अर्थ, प्रयोग नुसता भपकेदार असणे श्री. मुजुमदार यांना मान्य नाही. वाङ्मयगुणांनाही ते महत्त्व देत असत हे यावरून स्पष्ट आहे. त्याकाळी बहुतेक नाटक मंडळ्या लेखनगुणापेक्षा, प्रयोगदृष्ट्या भपक्याला किती वाव आहे ते पाहून नाटके स्वीकारीत असत असे दिसते. पारसी नाटक मंडळ्यांच्या अनुकरणातून ही अभिरुची निर्माण झालेली होती. त्याविरूद्ध रंगभूमी नियतकालिकात बरेचदा लिहिले गेले आहे यात संपादकीय धोरण दिसते.

धर्मरहस्य अथवा अंत्यजोद्धार — श्री. नेवाळकर

या नाटकावर श्री. रा. गो. दंडवते यांनी लिहिलेले आहे. (व.३, अं. ४/५, नोव्हें/डिसें. १९०९, पृष्ठ १ ते ८)

श्री. नेवाळकर यांच्या या नाटकाचे प्रयोग, श्रीमहालक्ष्मी प्रासादिक नाटक मंडळी. पुण्याच्या विजयानंद नाटकगृहात करते अशी माहिती परीक्षणलेखकाने दिलेली आहे.

या नाटकाच्या गुणदोषांचे विवेचन करण्यापेक्षा, काही, नाट्यविषयक मतांचे दिग्दर्शन करणे हा श्री. दंडवते यांचा हेतू दिसतो. या नाटकाचे नाव चुकीचे आहे असे सांगून ते म्हणतात, की धार्मिक विषयांवर किंवा त्यासारखीच आपली मते लोकांच्यापुढे मांडण्याकरिता केलेली नाटके लोकप्रिय होत नाहीत. वादग्रस्त विषयांवर नाटके लिहिणे हे नाट्यकलेस

अहितकारक आहे. ‘ तिविकार , ‘´डधारी सारखी नाटकेही पक्षाभिमानामुळे आणि इतर अनेक गोष्टींमुळे मातीमोल होतात. या नाटकाचा हेतू वर्णाभिमानामुळे झालेले तोटे दाखविण्याचा आहे.

त्या काळात, सामाजिक विषयांवरील हेतूप्रधान नाटके जोमाने लिहिली जात होती त्या काळात हे मत व्यक्त केले गेले आहे ही गोष्ट ध्यानात घेण्याजोगी आहे. नाट्यकलेचा विकास अधिक महत्त्वाचा, नाटकात केलेले विषयप्रतिपादन दुय्यम, अशी श्री. दंडवते यांची भूमिका दिसते. कलावादी दृष्टिकोन असणारी ही भूमिका त्याकाळी कमी प्रमाणात पाहावयास मिळत होती. नाटके हे मनोरंजनाबरोबरच नीतिशिक्षणाचे साधन मानले जात होते म्हणून जी सामाजिक नीती त्या त्या नाटककाराला मान्य होती, तिचा पुरस्कार तो आपल्या नाटकाद्वारे करीत असे. यातील धोका लेखकाने दाखविलेला आहे. परंतु त्याचे सविस्तर स्पष्टीकरण त्याने केलेले नाही. नाटकाचा विषय जर वादग्रस्त असेल तर त्याच एका बाबीकडे लक्ष देऊन नाटकाची पारख केली जाते. नाटक एक वाङ्मयकृती म्हणून तिचे रसग्रहण करण्याची क्षमता फारशी दाखविली जात नाही. यादृष्टीने नाट्यकलेची हानी होते असे श्री. दंडवते यांना म्हणावयाचे आहे. नाटक ही कला प्रयोगरुपाने जनसमूहापुढे मांडावयाची असते त्यामुळे समाजमन दुखावले जाईल अशी मांडणी जर नाटकात केली गेली तर ती नाटके मातीमोल होतात असे श्री. दंडवते यांचे मत आहे. अर्थात हे मत त्या काळात सर्वांना मान्य होणारे नव्हते आजही सर्वांना मान्य होणार नाही. परंतु सामाजिक नाटकांचा प्रवाह जोमदार असताना त्या संबंधीचे विरोधी मत ठामपणे मांडणे या संदर्भात श्री. दंडवते यांचे हे त्रोटक विवेचन लक्षात घ्यावयास हवे.

कमला – यशवंत नारायण टिपणीस

‘ नवी पुस्तके – व. ४ अंक ११, नोव्हें. १९११, पृष्ठ १७ ते २५

महाराष्ट्र-नाटक मंडळीतील प्रमुख नट यशवंत नारायण टिपणीस यांनी, थेल्मा या प्रसिद्ध कादंबरीच्या आधारे पाच अंकी गद्य नाटक लिहिलेले आहे. एका नटाने लिहिलेले नाटक म्हणून संपादकांना, या नाट्यलेखन प्रवृत्तीविषयी कौतुक व समाधान वाटलेले आहे. बहुतेक नट यंत्राप्रमाणे तीच तीच भाषणे बोलत असत. त्यांच्या मनावर वाङ्मयीन संस्कार झालेले नसत. या पार्श्वभूमीवर, जर नट अभ्यास-वाचन-लेखन या पद्धतीने चांगले काम करू लागला तर ती स्वागतार्हच घटना होती. नटांनी सुशिक्षित व सुसंस्कारी होण्यावर संपादक

श्री. मुजुमदार यांनी सतत भर दिलेला आहे असे सुशिक्षित नट जर आणखी एक वरची पायरी गाठून नाटककार होऊ शकले तर नाट्यक्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने तो महत्त्वाचा टप्पाच म्हणायला हरकत नाही. संपादक म्हणतात, ‘‘ रंगभूमीवर दाखवावयाच्या गोष्टींचे आकलन बुध्दीने ज्यांना करता येते आणि निरनिराळ्या काळातील, अवस्थेतील व प्रसंगांतील भिन्न भिन्न व्यक्तींच्या कृतींना मूलभूत असलेल्या विकारात ज्यांना शिरता येते असे सुशिक्षित नट नाटककार या नात्याने चमकू लागल्यास ते सर्वथैव इष्ट व भूषणावह नाही असे कोण म्हणेल (रंग, व.४ अंक ११, नोव्हें. १९११ - ‘ नवी पुस्तके - पृष्ठ १७)